# प्रकरण सहावे

## महदंबेच्या वाङ्मयाचे मूल्यमापन

# प्रकरण सहावे

## महदंबेच्या वाङ्.मयाचे मूल्यमापन

### महदंबेच्या वाङ्.मयाचे मूल्यमापन - आद्यत्व:

आता जवळजवळ मराठी साहित्यातील १) आद्य ग्रंथाचा मान लीळाचरित्राला दिला गेला आहे. लीळाचरित्र हा मराठी साहित्यातील आद्य ग्रंथ म्हणून मान्यता पावलेला आहे. आतापर्यंत हा आद्यत्वाचा मान मुकुंदराजांच्या "विवेकसिंधू"ला देण्यात आला होता. परंतु काही विचारवंताच्या मते तो आद्य ग्रंथ होऊ शकत नाही. वि.का. राजवाड्यांच्या मते शके ९६१ मध्ये लिहिलेली "ज्योतिष रत्नमाला" मराठी टीका उजेडात आल्यावर विवेकसिंधूचे आद्यत्व मागे पडले. पण ज्योतिष रत्नमाला टीका गद्यात असल्यामुळे "विवेकसिंधू" हा मराठीतील पहिला पद्य ग्रंथ म्हणून टिकून राहिला. परंतु हीही निश्चितता फार काळ टिकू शकली नाही. कारण तोपर्यंतच वाङ्.मय भांडारात पडून राहिलेले महानुभावपंथाचे ग्रंथ प्रकाशात यायला सुरूवात झाली व सरस्वतीच्या अज्ञातदालनातील हे विचारमोती बाहेर पडले. त्याच्यात महदंबेच्या नावांवरील धवळे हे मराठी मानसांच्या प्रत्ययाला आले. आणि जनसामान्यांना व वाचक वर्गाला त्यांचे प्राचीनत्व मान्य करावे लागले. हे धवळे महानुभावपंथांच्या पंचकृष्णापैकी एक जे गोविंदप्रभु त्यांच्या कृतक विवाहाप्रसंगी हे धवळ गाईले गेलेले होते. म्हणजेच या धवळ्यांची निर्मिती गोविंदप्रभूंच्या मृत्यूपूर्वी केली गेली असावी असे संशोधकांचे ठाम मत झाले." संशोधकाच्या मते मुकुंदराजांच्या विवेकसिंधूचा रचना काळ आजही निश्चित नाही. तो डळमळीत आहे. कारण त्याला पाहिजे तसा सत्य पुरावा आज तरी हाती लागत नाही. त्यामुळे आद्य मराठी कवयित्री पदाचा मान निसंदिग्धपणे महदंबेलाच द्यावा लागतो. महदंबेच्या धवळ्यांची निर्मिती इ.स. १२८७ पूर्वी झालेली आहे. म्हणजे तिचा रचनाकाळ १२०८ पूर्वी केव्हातरी ठरवण्यात आला आहे. या धवळ्यांची करती महदंबा

ही ज्ञानदेवपूर्व आहे हे निश्चित आहे. आता लीळाचरित्र त्यांच्याही मागे जाते. चक्रधरांच्या निर्याणानंतर लगेचच महानुभाव साहित्यिकांनी लीळाचरित्राची निर्मिती केली आहे. महानुभावांच्या इतिहासात इ.स. १२७८ हा लीळाचरित्राचा रचना कालावधी सर्वमान्य झाला आहे. आणि म्हणूनच त्याला मराठीतील आद्य ग्रंथाचा मान प्राप्त झाला आहे. पण कांही विचारवंतांच्या मते आद्य मराठी ग्रंथकार म्हणून श्रीचक्रधरांना मानण्यात येते. परंतु चक्रधर स्वामी वास्तविक पहाता चक्रधरस्वामींनी सर्व संग परित्याग केलेला होता व ते विरक्त सन्यांशी होते. त्यामुळे त्यांच्याकडून साहित्य निर्मिती होणे हे सत्य वाटत नाही. चक्रधरांना लोकांना एकादी गोष्ट पटवून देण्याची कला अवगत होती. याचे उल्लेख लीळाचरित्राकारांनी ग्रंथात केलेले आहे. परंतु ह्या कथा त्यांनी शिष्यांना व जनसामान्यांना ऐकविल्या आहेत. असे असले तरीही ते मराठीतील आद्य कथाकार होऊ शकत नाहीत. आतापर्यंत तरी मराठीत त्यांच्या नावावर कोणताही ग्रंथ पहावयास मिळत नाही. परंतु द.भि. कुलकर्णी व डॉ. वि.भि. कोलते यांनी मात्र चक्रधरांच्या बाजुने मत मांडले आहे. परंतु ही सारी विधाने एकांगीच वाटतात. कारण त्यांनी लीळाचरित्राचा एकांक सूत्रपाठ दृष्टांतपाठातील सूत्रे हे सारे साहित्य चक्रधरांच्या नावांवर टाकले आहे. या गोष्टीचा विचार करता माझ्यामते तरी ही विधाने एकांगी वाटतात.

कांही विचारवंतानी हा मराठी साहित्यातील आद्य ग्रंथाचा मान "ज्योतिष रत्नमाला" या ग्रंथाला दिला आहे. परंतु डॉ. वि.भी. कोलते यांनी 'ज्योतिष रत्नमाला' हा ग्रंथ आद्य ग्रंथ नसल्याचे सप्रमाण सिध्द केले आहे. "विवेकसिंधू" हा ग्रंथ मराठीतील आद्य ग्रंथ नाही इतकेच नव्हे तर ज्ञानेश्वरी लेखनानंतर जवळ जवळ ५० वर्षांनी तो लिहिला *गेला* असावा असेही समीक्षकांचे मत आहे. लीळाचरित्र हाच मराठीतील पहिला ग्रंथ आहे हे आता निश्चित झाले आहे. परंतु धावल्याचा पूर्वार्धा हा गोविंदप्रभू हयात

असताना लिहिला गेला आहे. त्यात प्रत्येकी चार चरणांची त्र्यऐंशी कडवी आहेत. याउलट कोलते यांनी संपादित केलेल्या लीळाचरित्राच्या लीळांची संख्या १२०० पेक्षा अधिक आहे. धवळ्यात कृष्ण रुक्मिणी स्वयंवराचे भावपूर्ण चित्रण केले आहे. तर लीळाचरित्रात महानुभावाच्या पंचकृष्णापैकी अखेरचे कृष्ण श्रीचक्रधर संस्मरण केले आहे. त्यामुळे या दोन्ही साहित्यकृतीची एकमेकाशी तुलनाच होऊ शकत नाही. परंतु इथे प्रश्न आहे तो कालखंडाचा लीळाचरित्र हे कोलत्यांच्या मते इ.स. १२७८ मध्ये लिहिले गेले ही गोष्ट आता सर्वमान्य झाली आहे. तर धवळ्याचा पूर्वार्ध १२७४ मध्ये लिहिला गेला हे ही आता निश्चित होऊ पहात आहे. म्हणून धवळे हे लीळाचरित्रापूर्वे ठरतात व पहिलेपणाचा मान त्यांच्याकडेच जातो. परंतु कोलत्यांच्या मते "विव्हावो-स्वीकारु" ही लीळा गोविंदप्रभु चरित्रात अखेरीस येते. त्यांच्या एकूण ३२३ लीळात विव्हावोस्वीकारु ही लीळा दोनशे चोवीसावा तिचा क्रम लागतो. ही वस्तुस्थिती पाहता त्यांच्या त्यांच्या मते गोविंदप्रभु निधनाच्या अगोदर वर्ष ते दोन वर्षा हे धवळे गाईले गेले असावेत. तर वा.ना. देशपांडे यांनी त्याचा कालावधी शाके १२०८ किंवा तत्पूर्वी कधीतरी दिला आहे.[२] त्यामुळे लीळा-चरित्र हाच मराठीतील आद्य ग्रंथ ठरतो. परंतु तो गद्य ग्रंथ आहे. आणि म्हणूनच मराठीतील आद्य कवयित्री पदाचा मान महदंबेकडे जातो व धवळे हेच आद्य कथाकाव्य म्हणून मान्यता पावतात. असे माझे स्वत:चे मत आहे.

महदंबेच्या धवळ्याचे पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन भाग पडतात. पूर्वार्धाची रचना शाके १२०८ पूर्वी झालेली आहे. याची ओवीसंख्या ८३ आहे. हा पूर्वार्ध महदंबेचा स्वत:चा आहे. या पूर्वार्धात तिने सुरवातीस श्रीचक्रधरांना वंदन केले आहे व तिने या पूर्वार्धात आपण श्री गोविंदप्रभुसाठीच धवळे गात आहोत असे स्पष्टीकरणही केलेले आहे. श्रीकृष्ण हे महानुभावपंथाचे आद्य दैवत आहे व त्याचमुळे श्रीकृष्णाचे गुणवर्णन व कथा सांगणे ही महानुभावीय पंथीय प्रेरणा आहे. भक्ती या एकाच प्रेरणेतून धवळ्याचा उगम झाला आहे. श्रीकृष्ण हा महानुभावीय पंचकृष्णापैकी एक असल्यामुळे त्याची भक्ती ही अटळ आहे.

धवळे हा शब्द "धवळ" शब्दाचे अनेक वचन आहे. "धवळ" हा शब्द मराठीत संस्कृत धवळ या शब्दावरून आला आहे. "धव" म्हणजे "वर" असा अर्थ होतो व धवळे म्हणजे लग्नात वरविषयक श्रेष्ठत्वाने गायिलेले गीत. धवळ हा शब्द एकनाथांच्या रुक्मिणी स्वयंवरात "सापडतो."[3] सभा बैसली निजबोधे। धवळे गाती आनंदे. असा धवळे या शब्दाचा त्यांनी वापर केला आहे. महानुभावीय कवी नरेंद्र यांनी आपल्या रुक्मिणी स्वयंवरात "धवळे" हा शब्द अनेकवेळा वापरला आहे. तसेच हेमचंद्राच्या "छंदानुशासन" व सोमेश्वराचा माणसो-उल्हास या ग्रंथातही धवळे हा शब्द वाचावयास सापडतो.

तथापी "धवळे" ही महानुभावीय कवयित्री "महदंबा" हिची स्वतंत्र ✓ निर्मिती आहे. परंतु ही स्वतंत्र निर्मिती असली तरीही त्या पाठीमागील निर्मितीप्रेरणा मात्र गोविंदप्रभूंची आहे. याचे पुरावे आपणाला गोविंदप्रभू चरित्रातून मिळतात. त्याची निर्मिती प्रेरणा ही गोविंदप्रभू चरित्रातील लीळा क्रमांक २२४ मध्ये वर्णिली आहे. या लीळेला "विव्हावोस्वीकारु" असे म्हटले गेले आहे. त्याची थोडक्यात परिचय असा -

एक दिवस गोविंदप्रभूचे सर्व शिष्य भिक्षेसाठी गेले असताना गोविंदप्रभू आणि महदंबा बसली होती. तेव्हा त्याच मार्गावरून एक तेलीन लग्नाची बाशींगे घेऊन निघाली होती. ते पाहून गोविंदप्रभूंना लग्न करण्याची इच्छा झाली आणि हे महदंबेला ज्ञात झाले. आणि तिने त्या तेलीणीला गोविंदप्रभूसाठी बाशिंग मागितले. ते बाशिंग महदंबेने गोविंदप्रभूंच्या कपाळावर बांधले तेव्हा गोविंदप्रभू म्हणाले -

"आवो मेली जाय गाय गाय म्हणे:" महदाइसी म्हणतीले:" कायी गाओजी १" गोसावी म्हणतीले : आवो कृष्ण रुक्मिणी गाय म्हणे : तुरया थाट गाय म्हणे आणि महदाइसास स्फूर्ती झाली. इतुकेन रुक्मिणी स्वयंवर गावोची लागली १ तिने "निरुता लागली जीवी" हे कडवे गाईले : आणि

गोसावी म्हणीतले. आवो, होवो होवो :[४] नीरूता लागला जीवी अशा प्रकारे गोविंदप्रभूंनी या गीताला साथ दिली व इथेच "धवळे" गायीले गेले. हे धवळे उत्स्फूर्त असले तरीही ते गोविंदप्रभूंच्यासाठी गायिले गेले आहेत. कारण गोविंदप्रभूंनी महदंबेलाच गाण्याचा आग्रह धरला होता. त्यामुळे या धवळयांची प्रेरणा गोविंदप्रभू आणि त्यांचा कृतक विवाह हीच आहेत. हे गीत म्हणजे गाण्यातील अखंडत्व आहे. हे सूचित करते. तिच्या गाण्याला गोविंदप्रभूंनीही प्रतिसाद दिला आहे. म्हणजेच महदंबेने गोविंदप्रभूंच्या इच्छेची अपेक्षापूर्ती केली आहे हे धवळे गाताना ती स्वत: करवली झाली आहे. व तसे समजून तिने हे धवळे गायिले आहेत. तिला अनुभूतीचा जणू ध्यासच लागला आहे. जरी याप्रसंगी तिची भूमिका ही कविची नसली तरीही ती रुक्मिणी सैवंर गाते आहे आणि त्याचमुळे या गाण्याला जिव्हाळा प्राप्त झाला आहे. या धवळयांच्या स्वरूपात एकसलगता व अखंडपणा हे त्याचे वैशिष्टय म्हणावे लागेल.

या धवळयांचे दोन भाग पडतात - १) पूर्वार्ध, २) उत्तरार्ध. पूर्वार्धाची रचना ही स्वत: महदंबेची आहे व उत्तरार्धाची रचना ही लक्ष्मेंद्र भट्ट व म्हाइंभट यांची असल्याचे म्हटले जाते व तसे कांही पुरावेही मिळतात. परंतु या उत्तरार्धाची रचना ही खास करून महदंबेसाठीच तयार केली गेली आहे. त्याची रचनाही महदंबेच्या पूर्वार्धासारखीच आहे. त्यामुळे महानुभावीय लोक ही रचना महदंबेचीच म्हणतात व त्याला विचारवंतानीही मान्यता दिली आहे. परंतु विचार करता हे मत चुकीचे वाटते. कारण जरी ही रचना महदंबेसाठी तयार केली गेली तरी पूर्वार्ध मात्र तिचा आहे असे म्हणता येणार नाही. पण म्हाइंभट व लक्ष्मेंद्र भट्ट हे स्वत:च महदंबेचे श्रेष्ठत्व मान्य करतात त्यामुळे या धवळयांची श्रेष्ठत्व महदंबेलाच विचारांती द्यावे लागते. इथे मला पाठीमागे म्हटल्याप्रमाणे असा प्रश्न उभा रहातो की महदंबेला लिहिता वाचता येत होते का ? परंतु हा प्रश्न तितकासा महत्त्वाचा नाही. तर त्याचे उत्तर

इतकेच देता येईल की महदंबेला अक्षार ज्ञान हे असलेच पाहिजे व यातूनच तिने पुढे मातृकी रुक्मिणी स्वयंवराची वृतबध्द रचना केली आहे. यावरुन आपणाला हे नाकारता येणार नाही.

धावळ्याची रचना ही ओवीबध्द रचना आहे व ती सयमक आहे याची ओवीसंख्या पूर्वार्ध व उत्तरार्ध मिळून १४८ (१४८) आहे. यात प्रत्येक कडव्यात चार चरण येतात. धावळ्यांच्या छंदाबाबत डॉ. ना.ग. जोशी यांना आपल्या "मराठी छंदोरचना" या ग्रंथात बरेच विवेचन केले आहे. या विवेचनाअंती त्यांच्या मते या रचनेत अष्टमात्राक आवर्तने आढळतात. तर वा.ना. देशपांडे यांच्या मते धावळ्याची रचनाही ग्रांथिक ओवीसारखी असल्याचे म्हणतात.[5] त्यांच्या मते या धावळ्यात आवर्तने शोधणे व्यर्थ आहे. कारण त्यांनीहि धावळ्याचे गायन ऐकले आहे. त्यामुळे हे धावळे गात असताना शब्दांची व स्वरांची अनेक ठिकाणी ओढाताण करावी लागते. म्हणूनच ते म्हणतात, धावळ्यात गणमात्रा, अक्षारसंख्या, यांची अपेक्षा करणे निरर्थक आहे. धावळ्यात एक प्रकारची सूक्ष्म लयबध्दता आहे व त्यामुळेच धावळ्याचा छंद मुक्त ओवी ठरतो. असे त्यांचे मत आहे. व हे मत "गेयता" आणि वृतबध्दता या दोन गोष्टीचा अभ्यास करता हे मत यथायोग्य आहे.

"धावळे" हे रुक्मिणी स्वयंवराची कथा असली तरीही याची सुरवात मात्र

सर्वेसवराचे शिरी धरुनिया चरण :
मग धावला गाइन गोविंदुराणा :
जेणे रुक्मिणी हरीएली तेणें पवाडे केलें अद्‌भुत
पाविजे परमगती भक्ति आइकता कृष्णाचरित्रा :
जय जय श्री प्रभुगोविंदा । धृपद ।। १ ।।

अशा प्रकारे चक्रधरांना वंदन करुन झाले आहे. यावरुन महदंबेला चक्रधरांच्या बद्दल नितांत आदर होता. हे निश्चित होते. या आदरापोटीच

तिने चक्रधरांनाही नमन केले आहे. अशा प्रकारे धवळ्याची सुरवात झाली आहे.

महदंबेचे "धवळे" म्हणजे मराठी साहित्यातील आद्य आख्यान काव्य आहे. या आख्यान काव्याचा विषय कृष्ण रुक्मिणी विवाह हा आहे. धवळ्याच्या पूर्वार्धात रुक्मिणी हरण कथेतील अत्यंत महत्त्वाच्या घटनेवर प्रकाश टाकला आहे. या पूर्वार्धात एकंदर त्र्याऐंशी ओव्यांचा समावेश करण्यात आला आहे. काव्यारंभी वरीलप्रमाणे चक्रधरांना नमन करुन तिची सुरुवात झाली आहे. पुढे कृष्ण वर्णन आले आहे. रुक्मिणीच्या कथेनेच रुक्मिणी हरणाच्या कथेचा प्रारंभ करुन महदंबेने काव्यदृष्टया औचित्य साधले आहे. धवळ्यातील कथानक सुरवातीपासूनच प्रभावी गतीशिल प्रवाही आणि संवादात्मक झाले आहे. यावरुन महदंबेजवळ नेमक्या, आटोपशिर आणि सांकेतिक शब्दात भरपूर आशय व्यक्त करण्याचे सामर्थ्य होते. हे नाकारता येणार नाही. या अल्पशब्दातच रुक्मिणीचे सौंदर्य गुण आणि वय याचे सार्थ चित्रण तिने केले आहे. पुढे रुक्मिणीचा विवाह हा श्रीकृष्णाशीच करावा असा प्रधानाचा सल्ला ऐकून तिथे उपस्थित असलेल्या राजपुरुषांच्यात खळबळ माजते. रुक्मिणीचा भाऊ रुक्मिंर या सल्ल्याने अतिशय रागावतो. गोळीया घरी रुक्मिणीस देणे उचित ठरणार नाही असे मनोगत व्यक्त करतो. हे नाट्यचित्र रंगवताना महदंबेने संवादात्मक रचना केली आहे. त्यामुळे ही रचना अत्यंत प्रवाही झाली आहे. तिची ही अभिव्यक्ति निश्चितच लक्षणिय ठरते. रुक्मिणी हरणाची ही कथा काव्यबध्द करत असताना महदंबा विवाह कथेत एक वेगळे भावरुप देऊन जाते. कारण रुक्मिणीच्या शक्तीच्या विरोधामुळे भीष्मक राजाने मनोमन ठरवलेल्या श्रीकृष्ण रुक्मिणी विवाहाच्या मानसाला तडा जातो त्याऐवजी त्याला रुक्मिणीचा विवाह शिशुपाळाशी ठरवावा लागतो. ही बातमी रुक्मिणीस लागते. त्यामुळे तिची निराशा बळावत जाते. व कृष्ण विरहाने ती अत्यंत व्याकुळ होते. या अवस्थेचे वर्णन महदंबेने अतिशय समर्थ शब्दात टिपलेले आहे.

पुढे रुक्मिणीला श्रीकृष्णाचा वेध लागतो व रुक्मिणी सुदेवाजवळ श्रीकृष्णास पत्रिका देते व त्याला द्वारकेस पाठवते. सुदेव ही पत्रिका घेऊन द्वारकेस येतो याचे वर्णन महदंबा सार्थ शब्दात करते. हे वर्णन करताना ती म्हणते,

"उपविष्ट सिंहासनी देव किन्नर बोळग करितो :
यादवी दरिवारितु सहस्त्र कनकदंडे लक्षावरी दळती :"

अशा प्रकारचा सर्व थाट पाहिल्यावर सुदेवाच्या मनात आश्चर्य प्रकट झाले. आणि श्रीकृष्णाला पाहून सुदेवाने त्याच्या पायावर लोटांगन घातले आणि त्याला आपण धन्य झालो असे वाटले. अशा प्रकारे श्रीकृष्ण आणि सुदेव यांची भेट महदंबेने अती अल्प शब्दात परंतु अत्यंत प्रभावीपणे या भेटीचे वर्णन तिने केले आहे. त्यावेळी आपल्या हेतुसिध्दीसाठी श्रीकृष्णासमोर सुदेव रुक्मिणीचे सौंदर्य वर्णन करतो. हे वर्णन करत असताना महदंबा लिहिते,

"भीमका कुमरी सुंदर रुक्मिणी लावण्यराशी :
त्रैलोक्य मोहिनी ताया विनंती पाठविली तुम्हासी
स्वामी जगन्नाथु भक्ता कैवारी,
शरणागताचा वेळाइतु तरी बीजे करावे मुरारी."

अशा प्रकारच्या सार्थ शब्दात महदंबेने रुक्मिणीच्या सौंदर्याचे शब्दचित्र उभे केले आहे. अशा प्रकाराचे सुदेवामुखीचे वाक्य ऐकताच द्वारकेस कुणालाही या गोष्टीचा सुगावा न लागता कृष्ण कौंडीण्यपुरास येतो.

श्रीकृष्णाचे आणि त्याच्या बरोबर बलरामाचे आगमन झाल्यानंतर रुक्मिणीची जी भावावस्था झाली आहे ती अत्यंत अलवार शब्दात महदंबेने टिपली आहे. कारण त्याचवेळी यादवेत्तर राजेलोकही तिथे आलेले आहेत आणि त्यामुळे रुक्मिणीची मनस्थिती दुभंगू पहात आहे. तिची अवस्था एखाद्या

आवर्तात सापडल्यासारखी झाली आहे. रुक्मिणीच्या या भावस्थितीचे वर्णन अती उत्कट शब्दात परंतु अत्यंत साधेपणात व समर्पकपणे महदंबेने हे भाव अभिव्यक्त केले आहेत.

याच अवस्थेत माडीवर उभ्या असलेल्या रुक्मिणीला कृष्ण दृष्टोपतीस पडतो व ती कृष्णाकडे झेपावते. या शब्दातून केलेल्या वर्णनात सांकेतिकता महदंबेने प्रकट केली आहे. त्याचवेळी सुदेव तिला सावरतो याचे वर्णन करताना महदंबा म्हणते -

"सावरिली बाळी" या शब्दातून त्याच्यातील प्रेमळपणा व ममत्व महदंबेने सूचित केले आहे. यातून रुक्मिणी विषयीची सुदेवाची आदरभावना व्यक्त झाली आहे. वास्तविक श्रीचक्रधरांच्या कल्पनाशक्तीने निर्माण झालेल्या या प्रसंगात मोठे नाट्य लपले आहे. तथापि अशा प्रसंगाचा निर्देशच केला आहे. परंतु प्रस्तुत प्रसंगातील नाट्याचा महदंबेने आपल्या धावळयात विस्तार साधला आहे. शिवाय या प्रसंगाचे एकूण रुक्मिणी हरण कथेशी तिने अतूट नाते प्रस्थापित केले आहे. हा प्रसंग महदंबेने आपल्या धावळयात अठ्ठेचाळीस ते साठ या ओव्यातून प्रकट केला आहे. अशा प्रकारे ही गुंफण करून तिने धावळयांना आपल्या प्रतिभेने श्रेष्ठत्वच प्राप्त करून दिले आहे.

आरोगणेस जाताना रस्त्याच्या दुतर्फा रुक्मिणीच्या मैत्रिणी उभ्या आहेत. रुक्मिणीचे मनोगत श्रीकृष्णास सांगण्याची वेळ त्यांना तेथेच प्राप्त झाली आहे. रुक्मिणीचे मनोगत निवेदन करु इच्छिणाऱ्या त्या राजकुमारी स्वत:चेच मनोगत व्यक्त करु लागतात. अशा प्रकारचा प्रसंग आपल्या धावळ्यातून अतिशय कौशल्याने महदंबेने रेखाटला आहे. यावरून रुक्मिणीच्या सख्यांनाही कृष्णाचा कसा ध्यास लागला आहे ते प्रत्ययाला येते. कृष्णदर्शनाने या रुक्मिणीच्या सख्या स्वत:चे देहभान हरवून बसल्या आहेत आणि त्या कृष्णाचे

स्तवन करु लागल्या आहेत. महदंबेने हे स्तवन अत्यंत मोजक्या शब्दात परंतु अत्यंत समर्थ शब्दात वर्णन केले आहे. यातून महदंबेच्या प्रतिभेचा आपणाला प्रत्यय आल्यावाचून रहात नाही.हे वर्णन करताना ती म्हणते -

एकी म्हणती वीरवयाभावे व पवीजैं हरी :
योगीए चींतीति ह्रदया भीतरी :
तो देवा आदि देवो एके गोकुळी केलें अवतरण
भक्ता कृपाळु सदा म्हणौनि लागलीया चरणा ।। ५२ ।।

अशा शब्दातून तिची प्रतिभा मोहरत राहिली आहे. पुढे सुदेवाच्या हाती रुक्मिणीने श्रीकृष्णास रूक्वत पाठविले खरे परंतु कृष्णाकडील वार्तेसाठी ती अत्यंत आतुर झाली आहे. त्यामुळे तो कधी परत येतो व दासीकडून आपणास श्रीकृष्णाविषयी सविस्तर कधी माहिती मिळते असे रुक्मिणीला झाले आहे. ही भावावस्था महदंबेने सार्थ शब्दात टिपलेली आहे. या धावळ्यातील महदंबेचा कृष्ण रुक्मिणीला आपले उचिष्ठ पाठवितो. शिवाय त्याबरोबर एक कौस्तुभ हारही तो रुक्मिणीला भेट देतो. हा हार पाहुन रुक्मिणीला झालेला आनंद यात तिने पाल्हाळ लावलेला नाही तर महदंबा म्हणते, "ते सुख केवी वर्णु जैसा मिनला प्रियोगोविंदु असे तिने वर्णन केले आहे.

अशा प्रकारे रुक्मिणी हरणाची कथा ही एक विवाह कथाच आहे. वास्तविक ही विवाह कथा खरी परंतु तिच्यातून श्रीकृष्ण आणि रुक्मिणीच्या मनाचे भावतरंग महदंबेने अलवारपणे टिपले आहेत. रुक्मिणी वेळोवेळी आपल्या सख्यांना कृष्णाबद्दल वेगवेगळे प्रश्न विचारुन ती त्याच्याविषयी माहिती मिळवती आहे.

कैसे सा सांगा गोपाळा असे विचारुन तिच्या मनाची आतुरता महदंबेने वाढविली आहे. या दासीनी मात्र रुक्मिणीच्या मनालाच सुखविण्याचा प्रयत्न

केला आहे. श्रीकृष्णदर्शनामुळे रुक्मिणीचा आनंद शिगेला पोहचताना प्रत्ययाला येतो. दासींच्याही मनावरचे भान सुटते व आनंदाच्या भरात त्या पटकन सांगून जातात -

तीया म्हणती देवी सांडा हेमातु :
लागले प्रेमपीसे जेव्हाळी देखिले श्रीजगनाथु :
सर्वांनी न देखोची तुझा ओ कौतु :
देखिले जेचि आंग तेथोनिया नयन न ढळती :

अशा प्रकारे रुक्मिणी दासींची व सख्यांची झालेली बेभान अवस्था अत्यंत मार्मिक शब्दात महदंबा चित्रित करते. दासी व सख्या बोलून जातात हे खरे परंतु क्षणभराने त्यांचे वागणे व बोलणे त्यांना स्वत:ला खटकते व त्या स्वत:ला सावरण्याचा प्रयत्न करतात आणि म्हणतात -

काइ सौं वाखानु हा नंदाचा कुमरु :
तुझा पती आम्हा पीता नाठवे आणिक विचारु.

असे केलेले वर्णन दासी आणि सख्यांच्या मनाची कृष्णासंबंधीची निरभ्र भावावस्थाच सांगून जाते. कारण श्रीकृष्ण दर्शनाने स्वत:चे देहभान विसरुन त्याचाच ध्यास लागणे हे साहजिकच आहे. यात त्यांचा कांही दोष नाही हे कृष्णवर्णन ऐकता ऐकता रुक्मिणीचे देहभान हरपते त्यावेळची तिची भावावस्था संभ्रमीत होते. या भावावस्थेचे चित्रण ती अल्पाक्षरात पण समर्थपणे ती चित्रित करते. ती म्हणते -

मन भ्रमीत ठेले जाली निश्चळ
-ह्रदय कमळी तोये कृष्ण सांवळा ...
वीसरली वीरव्य भाव चीत्त चैतण्ये वेधाले गोपाळा

अशा वेळी रुक्मिणीची मनोवस्था पाहून तिच्या सख्या व दासी तिला सावरण्याचा प्रयत्न करतात. याचे वर्णन महदंबेने अत्यंत आटोपशीर केले आहे. शेवटी सख्यानी कृष्णाचा केलेला धावाच रुक्मिणीला सावध करण्यास मदत करतो. याचे पर्यावसान कृष्णस्तुतीतच झाले आहे. रुक्मिणीची विरह अवस्था व दासी आणि सख्यांनी केलेले तिच्या बाबतीतील विविध उपचार याचे धवळयातील वर्णन पुढील पिढयांना लेखनकार्यात अधिक उपयोगी ठरले. आहे.

यानंतर ओवी क्रमांक ६८ ते ७५ या चरणात विवाहविषयक वर्णन महदंबेने केले आहे. ते अत्यंत वैचित्र्यपूर्ण आहे. या वर्णनात तिने भागवतादि ग्रंथांना प्रमाण न मानता तिने स्वमनाचे वेगळेपण तिने मांडले आहे. या तिच्या अवस्थेवरुन कृष्णरुक्मिणी स्वयंवराचा आटोपता शेवट करण्याची तिची वृत्ती प्रत्ययाला येते हे कथानक चित्रित करत असताना महंदबेच्या मनात विवाहविषयक सोहळयासंबंधी कांही कल्पना रुजल्या आहेत यातून तिने पूर्वबंधाने झुगारुण लाक्ली आहेत व स्वत:चा स्वतंत्र विचार मांडला आहे. कारण या प्रसंगातील पाल्हाळ आणि औचित्यभंग यावर महदंबेने कमालीचा संयम राखला आहे. जर हा पाल्हाळ महदंबा लावत बसली असती तर हे कथानक इतक्या सार्थतेला पोहचले नसते. या वर्णनाचे दुसरे वैशिष्ट्य असे की भागवतकरांनी सूचित केलेली श्रीकृष्णाच्या व्यक्तिचित्रणाची बाहयरेखा महदंबेने प्रथमच चित्रित केली आहे. हे कृष्णाचे बाहयरंग टिपण्यात महदंबा यशस्वी झाली आहे. हे कृष्णवर्णन करत असताना महदंबेचा तोल कुठे ढळलेला नाही तर जाता जाता ती रुक्मिणीचेही सौंदर्यचित्र रेखाटण्यास विसरत नाही. हे महदंबेचे लेखन कौशल्यच आहे.

रुक्मिणीने अंबिका यात्रेला जाण्यासंबंधी भीमकाजवळ केलेली विनंती महंदंबेने हा सारा प्रसंगच वाचकासमोर उभा केला आहे. आपल्या अल्पाक्षरत्वात तिने हे वर्णन सार्थकतेने रंगवले आहे. यातील अर्ध्याहून अधिक निवेदन धवळयाच्या फक्त एकाच चरणात येते आणि रुक्मिणीचे अंतरंग सूचित करुन जाते. यातून रुक्मिणीच्या मनोगताची चाहूल सूचित होते.

पुढे आलेले वर्णन श्रीकृष्ण आणि रुक्मीणी यांच्या मिलनाचा प्रसंग आहे या प्रसंगाच्या वर्णनातून महदंबेने या कथानकाचा उत्कर्षच गाठला आहे. परंतु हे वर्णन करताना तिच्या मनाचा तोल मात्र कुठे गेलेला नाही. तर कोणताही पाल्हाळ न लावता पुढील घटनांची ती केवळ सांकेतिक नोंदच करत रहाते. कांही प्रसंगात भागवत कथेला जवळून अधिक तपशिलाची भर घालून रंजकता आणण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु असे वाटत असले तरी ही वातावरण निर्मिती आहे. यातील रुक्मिणीही सुदेवाच्या सहाय्याची अखेरपर्यंत अपेक्षा करत रहाते. अखेर सुदेवच श्रीकृष्णाला म्हणतो "जी जी आपुली राणी सांभाळी जो" असे सुदेव श्रीकृष्णास म्हणताच कृष्ण रुक्मिणीला रथावर उचलून घेतो आणि मग ती त्याला माळ घालते हा प्रसंग तसा नवखा असला तरी यातून स्त्री मनाचे दर्शन घडत रहाते. भागवतातील रुक्मिणी ही धीट आहे तर धवळयातील रुक्मिणीही मनमिळावू आणि सालस थोडीशी भित्री अशी महदंबेने वाचकासमोर उभी केली आहे. कांही विचारवंताना हे जरी खटकत असले तरीही त्याच्यातून स्त्री वृत्तीच प्रत्ययाला येते. भागवतात याला रंजकत्व प्राप्त झाले असले तरी धवळ्यात मात्र महदंबेने या अंबिका दर्शनाला पाल्हाळ न लावता अत्यंत साध्या नि सुटसुटीत शब्दात या प्रसंगाला रुप प्राप्त करुन दिले आहे. तर थोडक्यात रुक्मिणीचे मनोगत आपल्यासमोर ठेवते हे तिचे वैशिष्ट्य आहे. ही यथार्थता इतकी साधली आहे की रुक्मिणी अंबिकेला प्रार्थना करते, "तू मज वरद होई वेगी मेळवी यादवराजा" अशा यथार्थ शब्दात अन्य कोणता पाल्हाळ न लावता ते मर्मग्राही शब्दात तिने स्पष्ट केले आहे व औचित्य साधले आहे. जरी रुक्मिणी सुदेवाच्या सहाय्याची अपेक्षा करीत असली तरी ठरावीक कालावधीनंतर ती आत्मप्रेरणेनेच वागू लागते. याचे प्रत्यंतर ओवी क्रमांक ७८ मध्ये आपल्याला येते. महदंबेने कांही वेळेला स्वत:च रुक्मिणीला सावरले आहे. ती योग्य तेथे स्वत:चा तोल ढळू देत नाही. आणि त्यातूनच तिची पात्रनिर्मिती व औचित्य कटाक्ष हा महदंबेने अत्यंत वैचारिकपणे साधला आहे त्यामुळे कोठेही रसभंग झाला नाही. कांही ठिकाणी तिने रुक्मिणी सौंदर्य

रेखाटले असले तरी कुठेही ते अवास्तव होउ दिलेले नाही. भागवतकारांनी रुक्मिणी सौंदर्य वर्णन अतिरेकी केले असले तरी महदंबा मात्र कोठे त्याला अवास्तवता न आणता सांकेतिकताच आणून हे शब्दचित्रच अधिक बळकट करते. कारण तिने कुठेही रुक्मिणी स्वयंवराचा वेगळा अवास्तव प्रसंग आणलेला नाही. रुक्मिणीच्या बाह्यात्काराावर तर तिने कुठेच विकृत सौंदर्याला स्थान दिलेले नाही. त्यापेक्षा महदंबा रुक्मिणीच्या अंतर्गत सौंदर्यावर आपले मन वेधते. त्यामुळे या धवळ्यातील श्रीकृष्ण रुक्मिणी मिलन प्रसंगास एक नवाच अर्थ प्राप्त झाला आहे आणि म्हणूनच रुक्मिणीच्या बाहय सौंदर्याला टाळून महदंबेच्या प्रतिभेने पांडित्य आणि सांकेतिकता यांचा उत्कृष्ठ मिलाफ साधला आहे. महदंबेला ही भावोउर्मी चित्रित करणे कांही अवघड नव्हते. परंतु रुक्मिणीच्या मनाची कोमलता महदंबेने आबादीत ठेवली आहे. ही कोमलता तीने कोमेजून टाकलेली नाही. तर अत्यंत सोप्या शब्दात सूचितकेले आहे.

श्रीकृष्ण रुक्मिणी मिलनात केवळ भावात तो रुक्मिणी न दाखवता मिलनोत्सुक कृष्णाही तिने उभा केला आहे. रुक्मिणीची अधिरता तिने संक्षेपाने परंतु तरीही अत्यंत श्रेष्ठत्वाने वर्णिली आहे व व्यक्तीमत्वातील समतोल साधला आहे.

महदंबेच्या धवळ्याचे हे वैशिष्ठय की श्रीकृष्णासारखे अमूर्तब्रह्म् जे मूर्तासी आले हा रुक्मिणीला पडलेला केवळ प्रश्न नव्हे तर तिच्या मनाची झालेली भावावस्था होय. मिलणाचा क्षण आता ती स्वत:च अनुभवते आहे. हा मिलनाचा परमानंद तिच्या शरीराचा रोम रोम प्रफुल्लीत करून टाकीत आहे. पाणेदार होले अतीतरल वाचा अशी भावातून रुक्मिणीच्या मनातील कृतज्ञता महदंबेने प्रकट केली आहे. रुक्मिणीने श्रीकृष्णाला वरमाला घातली आणि महदंबेने ही रुक्मिणी स्वयंवराची कथा इथेच संपवली आहे. या धवळ्याचे पूर्वार्धाचे शेवटी हे धवळे आपण गोविंदप्रभूंना ऐकविले आणि ही सर्व सेवा नागदेवाच्या चरणी अर्पण केली आहे. यावेळी ती म्हणते -

माहादाइया गोवींदरावो धावली आइकीवीले :
अमूर्त नग्न प्रभु केवळ मायावेष धारुनियां क्रीडा केली :
भुवस्तळी सारंगपाणी भक्ता कैवल्यदाता :
सेवा सर्वेस्वरु नागदेवा स्वामी : ।।४।।

म्हणजेच महदंबेने महानुभावपंथाच्या तीन पिढयांचा समन्वय आपल्या कर्तृत्वाने साधाला आहे. रुक्मिणी स्वयंवराची कथा तिला चक्रधारांनी सांगितली होती. ती धावळ्याच्या रूपाने तिने गोविंदप्रभूंना ऐकविली आणि ही ऐकविलेली कथा महानुभावपंथाचे आचार्य नागदेवाला तिने अर्पण केली. हे महत्कार्य महदंबेने केलेले आहे.

धावळे उत्तरार्धः
------------

कांही विचारवंताच्या मते धावळ्याचा उत्तरार्ध हा महदंबेचा नाही तर त्याची रचना ही म्हाइंभट आणि लक्ष्मींद्र भट्ट यांनी केली आहे. याचा पुरावा आपणाला स्मृती स्थळाच्या क्रमांक १७४ मध्ये मिळतो.

एकु दीसु म्हाइंभटीं लक्ष्मीधारभटी महादाइसातें म्हणीतले : समोरें "रुक्मिणीसैवर" का न करा : महादाइसी म्हणितलें : मज काई करवैल : तै गोसावीं वरु दीधला म्हणौनिक स्फुरले : म्हाइंभटी : लक्ष्मीधारभटीं म्हणितले : तरि आम्हीं शब्द घाडउनि (आणि) तुम्ही गा : महदाइसीं मानिले : (मग तेहीं शब्द घाडऊं पदें बांधिली : आणि महदाइसीं गाइली :) यापरी दुसरी माळ केली : स्मृतिस्थळ, स्मृति क्र.१७४).

अशा प्रकारे धावळ्याच्या उत्तरार्धाचे कर्तृत्व तिघांकडे रहाते. स्मृति-स्थळातील वरील ओवी पहाता म्हाइंभट्ट व लक्ष्मींद्रभट्ट यानी ही रचना केली आहे व महदंबेने ती गाइली आहे. हे निश्चित होते. उत्तरार्धातील धावळ्यांची संख्या ६३ असून त्याचा लेखनकाल १२३० पूर्वीच संभवतो. धावळ्याच्या उत्तरार्धात

रुक्मिणी स्वयंवराचे निवेदन आहे. धावळ्याच्या उत्तरार्धात श्रीगोविंदप्रभूंचा सुरवातीस जयजयकार केला आहे व लगेचच रुक्मिणी हरणाचे निवेदन आहे. रुक्मिणीने कृष्णास लिहिलेल्या पत्रिकेचा यात कुठेच उल्लेख आलेला नाही. विप्राचा निरोप कृष्णागमन अंबिकापुरात त्याचे वास्तव्य आणि अंबिकेच्या देवळात रुक्मिणी दर्शनास आली असता तिचे हरण हे सारेच प्रसंग भागवतातील आहे. वास्तविक महदंबेला श्रीकृष्ण रुक्मिणी विवाह कथेच्या उत्तरार्धाविषयीचे काव्य स्फुरतच नव्हते. कारण महदंबेच्या दृष्टीने श्रीकृष्ण रुक्मिणी विवाह कथा ही पूर्वार्धातच संपली आहे. तिच्या मते श्रीकृष्ण रुक्मिणी मिलनानंतर रुक्मिणी स्वयंवरासंबंधी कांही सांगावयाचे उरतच नाही. म्हणून उत्तरार्ध रचनेच्या बाबतीत महदंबा टाळाटाळच करताना दिसते. महदंबा आणि म्हाइंभट यांच्या रचनेत बरेचसे अंतर आहे. व ते मुत्सद्दी वाचकाला चटकन समजते. म्हाइंभट आणि लक्ष्मीधरभट्टे यानी महदंबेने जमविलेल्या तपशिलाच्या आधारेच उर्वरीत कथाभाग रचलेला आहे. त्याचे हे अनुकरण महदंबेला तितकेसे रुचलेले दिसत नाही. महदंबेच्या प्रतिभेवर भागवताचा प्रभाव आहे हे नाकारता येत नाही. त्यावरच चक्रधराच्या वाणीचा संस्कार झाला होता. आणि त्याचमुळे भागवताचा पूर्वार्ध हा जितका संपन्न आहे तितका उत्तरार्ध प्रभावी वाटत नाही. त्याच्यात वेगळेपण जाणवते. परंतु डॉ. वा.ना. देशपांडे व डॉ. तुळपुळे या दोघांच्या मतात अधिक साम्य आहे. त्यांनी उत्तरार्धाचे बरेचसे श्रेय म्हाइंभट व लक्ष्मीधर भट्ट याना दिले आहे व शेवटी हे दोघेही उत्तरार्धाचे सर्व श्रेय महदंबेलाच देतात. परंतु त्यानी दिलेली कारणे मात्र इतकी प्रभावी वाटत नाहीत. तर ती निर्जीव वाटतात. परंतु हे नक्की की हा उत्तरार्ध महदंबा गात असताना त्याच्या-वरुन महदंबेचा अखेरचा हात फिरलाच असावा. कारण रचना कौशल्यात विचार-वंताच्यात दुमत असले तरी धवळे स्वरात गाताना पूर्वार्ध व उत्तरार्ध याच्या रचनेत म्हणावा तितकासा फरकच वाटत नाही.

उत्तरार्धाच्या रचनेचे अगदी सरळ सरळ दोन भाग पडतात. पहिल्या भागात श्रीकृष्णरुक्मिणी यांच्यातील संघर्षाचे चित्रण चित्रित झाले आहे.

हा पहिला भाग दहा ओव्यात संपला आहे व दुसरा विभाग पंचावन्न ओव्यात विभागला आहे. म्हणजेच कृष्ण व रुक्मिणी यांच्यातील संघर्षापेक्षा कृष्ण व रुक्मिणी यांच्या विवाह चित्रणावरच अधिक भर देण्यात आला आहे व तसा तो स्पष्ट जाणवतोही यात कुणाचेच दुमत असेल असे वाटत नाही. उत्तरार्धाच्या रचनेवर संस्कृतातील 'ब्रह्म्-वैवर्त' पुराणाचा प्रभाव असावा असे जे कांही विचारवंतांचे मत आहे ते येथे खरे वाटत नाही. कारण भागवतातील रुक्मिणी स्वयंवर व ब्रह्म् वैवर्त पुराणातील श्रीकृष्ण रुक्मिणी विवाह कथा या दोन्हीत बरीच भिन्नता आहे. त्यात महदंबेच्या प्रतिभेची कोठेही चमक जाणवत नाही. तरी देखिल धवळयाच्या उत्तरार्धाचे श्रेय महदंबेचेच आहे. कारण उत्तरार्ध हा महदंबेसाठी लिहिला गेला तो महदंबेकडून गायिला गेला आणि गात असताना महदंबेने योग्य तेथे गायनास बदल मूळ धवळयात करुन आणलाच असणार हे नाकारुन चालणार नाही आणि अखेरीस आद्य कवयित्री पदाचा मानही महदंबालाच द्यावा लागतो. कारण एक्टा पूर्वार्ध महदंबेच्या प्रतिभेची सर्वांना प्रचिती आणून देण्यास समर्थ आहे म्हणून जे महदंबेसाठी लिहिले गेले ते महदंबेचेच आहे असे महानुभावही मानतो. तसेच शास्वत असा अन्य कोणताही पुरावा सद्य:स्थितीत तरी उपलब्ध नाहीत. त्यामुळे उत्तरार्ध निर्मितीचा मान महदंबेलाच द्यावा लागेल. तोच योग्य आहे.

"मातृकी रुक्मिणी स्वयंवर" हे महदंबेचे दुसरे काव्य होय. हे काव्य म्हणजेच प्रा. वा.ना. देशपांडे यांच्या मते "धवळे या ध्वनीचा मातृकी रुक्मिणी स्वयंवर हा शुध्द प्रतिध्वनी होय." यामताशी मी स्वत:ही सहमत आहे. कारण महदंबेची पहिली कलाकृती जे धवळे आहेत त्या धवळयाचीच रुक्मिणी स्वयंवराची कथा मातृका वृत्तात महदंबेने गुंफली आहे. तेच हे मातृकी रुक्मिणी स्वयंवर होय. कथा एकच माध्यम फक्त वेगळे या मातृकी रुक्मिणी स्वयंवराच्या ११० ओव्या आहेत. तर धवळयांची ओवी संख्या १४८ इतकी आहे हे धवळयांचेच काव्य मिळालेल्या वेळात कलात्मकतेने महदंबेने मातृकी वृत्तात बांधले इतकेच वेगळेपण. ११० ओव्यां-

पैकी एक ते ब्याऐंशी ओव्यात क ते क्ष पर्यंत मातृका आहेत तर ८३ ते ११० ओव्या पुन्हा अ पासून उ पर्यंत व नंतर भ, ट, च, द, व, म, न, व, असा अक्षर क्रम साधला आहे. निवेदनाची गतिमानता वृत्तातील लयबध्दता आणि अत्यंत सफाईदार रचना ही मातृकी रुक्मिणी स्वयंवराची ठळक वैशिष्टये आहेत. इथे मात्रा धावल्यातील पाल्हाळ पहावयास मिळत नाहीत. कथानक अत्यंत आटोपशीर आहे. कांही ठिकाणी म्हणजे श्रीकृष्णावर्णन विप्राची पाठवणी कृष्ण दर्शनामुळे वेडावलेली रुक्मिणी तिने या वेडाच्या भरात सज्जावरुन घेतलेली उडी हे प्रसंग धवळयातून जसेच्या तसे घेतलेले आहेत. परंतु हे वर्णन मात्र रचनेच्या दृष्टीने प्रासादिक आणि प्रशास्त झाले आहे. कृष्ण रुक्मिणीचे मिलन चित्रन महदंबेने अत्यंत मार्मीक शब्दात परंतु रेखीव केले आहे. हे शृंगार वर्णन मात्रा कुठेही बाधक झालेले नाही. आणि त्याचमुळे कथानकाला कुठे व्यंग न येता अत्यंत सौंदर्यपूर्ण आणि सार्थ अशी ही रचना हे त्याचे श्रेष्ठतम् वैशिष्टय आहे.

या रचनेशिवाय अ.ना. देशपांडेच्याच आद्य मराठी कवयित्री या पुस्तकात महदंबेची एक आरतीही सापडते. या आरतीत तिने श्रीचक्रधरांचे आरत्य केले आहे. ही सहा ओळीची आरती रचनादृष्टया अत्यंत साधी आहे. पण तिला भावनेचा गोडवा आहे.

याशिवाय महदंबेचे आणखी स्फुट काव्य असावे असे वाटते. परंतु ते सध्य स्थितीत मात्रा कुठे उपलब्ध नाही. महदंबेच्या काव्याच्या ओव्या या अत्यंत रेखीव आहेत. शब्दरचना आणि ओघवती शैली रेखीवपणा अल्पाक्षरत्व हे महदंबेच्या ओवीचे वैशिष्टय आहे.

ही महदंबेची संपूर्ण कविता ओवी या वृत्तात वृत्तबध्द झाली आहे. आणि तिची रचनाही अत्यंत साधी व सोपी आहे. यातून महदंबेच्या स्त्रीसुलभ वृत्तीचे दर्शन झाल्याशिवाय रहात नाही ही सारीच रचना महदंबेच्या प्रौढावस्थेत झालेली आहे. विचाराचा पोक्तपणा प्रत्ययाला येतो. रचनेतून

आलेला शब्दावरील संयम किंवा प्रसंगातील वर्णन संयम तिने अत्यंत कौशल्याने हाताळला आहे. नरेंद्राच्या, एकनाथांच्या किंवा अन्य संत आणि पंडितकविसारखी या काव्यात कुठेही विकृती आलेली नाही. या ओव्यामधून तिच्या मातृत्वाचे रूप वाचकाच्या प्रत्ययाला आल्याशिवाय रहात नाहीत. महदंबा ही वृत्तीच्या दृष्टीने जरी विदुषी असली तरीही तिच्या संपूर्ण साहित्यात एक प्रगल्भ कलात्मकता आपल्याला जाणवते. रचनेतील कुशलता ही वेळोवेळी आपल्या प्रत्ययाला येत रहाते. या रचनेत कलात्मकतेबरोबर सौम्य प्रकारचा विनोदही वेळोवेळी जाणवतो. महदंबेची संपूर्ण भावनिष्ठा ही गोविंदप्रभू आणि चक्रधरांच्या चरणी अर्पण केली गेली आहे. तिच्या काव्यातून तिच्या जिज्ञासू वृत्तीचे दर्शन आपणाला होत रहाते. स्त्रीसुलभतेबरोबरच तिचे पांडित्यही तिच्या काव्यातून जाणवल्याशिवाय रहात नाही. तिच्या व्यक्तिमत्वाची जडणंघडणं चक्रधरांच्या सहवासात झालेली असल्यामुळे तिच्या विचाराच्या ठिकाणी एक प्रगल्भता असलेली जाणवते. आणि त्याचमुळे महदंबेने ही धवळ्याची किंवा मातृकी रुक्मिणी स्वयंवराची स्वतंत्र काव्याकृती तयार करताना तिची प्रगल्भता आणि प्रतिभा सामर्थ्य यामुळेच ही श्रेष्ठत्वाला जातात. यासाठी तिने भागवताचा आधार घेतलेलाच आहे आणि त्याचमुळे मातृकी रुक्मिणी स्वयंवरात चित्रित झालेले कृष्ण रुक्मिणी स्वयंवर हे इतर कविपेक्षा अधिक परिणामकारक रितीने चित्रित झाले. परंतु ही दोन्हीही प्रसंग काव्येच आहेत. ही त्याची कांही वेळेला मर्यादा मान्यच करावी लागते. वास्तविक तिच्या प्रत्येक साहित्यकृतीच्या निर्मितीस प्रसंगच कारणीभूत आहेत. कलावंत ही साहित्यकृती सर्वव्यापी व्हावी आणि स्थलकालाचे बंधन ओलांडून ती कालातीत न राहाता सर्वकालीन कृती व्हावी म्हणून धडपडत असतो. परंतु हे सर्वांनाच साध्य होत नाही. कांही बाबतीत मला स्वत:ला मात्र ही साहित्य-कृती निश्चितपणे काळाचे बंधन ओलांडताना जाणवते. कारण सद्य:स्थितीतही धवळ्याचे श्रेष्ठत्व श्रेष्ठ समीक्षक व वाचकांना नाकारता येण्यासारखे नाही.

महदंबेने धवळ्यांचे आणि इतर साहित्यकृतीचे लेखन करीत असताना महानुभावी यांना पवित्र असणारी गीता आणि भागवत हेच प्रमाण मानले आहे.

कारण महानुभावीय संप्रदाय हा पंचकृष्णांना मानणारा संप्रदाय आहे आणि त्याचमुळे यासर्व संप्रदायात श्रीकृष्ण हेच आद्य दैवत मानले गेले आहे. आणि दत्त हे पूज्य दैवत म्हणून त्यांनी मानलेले आहे. पुढे चांगदेव गोविंदप्रभू आणि चक्रधार हे श्रीकृष्णाचेच अवतार म्हणून महानुभावपंथ मानतो. स्वत: महदंबा तर चक्रधारांची शिष्या होती. या पंथात चक्रधारांना सर्वज्ञच मानले जाते आणि त्याचबरोबर चक्रधार हे पूर्णावतारही आहेत. त्यांच्याच सहवासात महदंबेच्या सर्वांगिण व्यक्तिमत्त्वाची जडणघडण झाल्यामुळे तिच्या व्यक्तिमत्वावर गीता आणि भागवताचाच अधिक परिणाम असलेला पहावयास मिळतो. तिच्या लेखनातून गीतेचेच तत्त्वज्ञान आणि भागवतातील प्रसंग मोठया प्रमाणावर चित्रित झाले आहेत. त्याचबरोबर त्या कालखंडात महाराष्ट्रात यादव राजांची सत्ता असल्याने यादव राजांच्याच दरबारी महदाइसा ही पूजाअर्चा करत असल्याने महदंबेवर यादवांचे दैवत श्रीकृष्ण त्याचा जास्त प्रभाव दिसून येतो आणि त्याचमुळे महदंबेने आपल्या लेखनास गीता हीच प्रमाण मानली.

महदंबेच्या साहित्यातून तत्कालीन समाजाचेही चित्रण झालेले आहे. महदंबेचे धवळे हे केवळ आद्य काव्य नाही तर ते तेराव्या शतकातील यादवकालीन समाजजीवनाचेच सर्वांगीण चित्र आहे. धवळे हे समाजशास्त्राचा कला परंपरेचा व महाराष्ट्रीय संस्कृतीचा अभ्यास करणाऱ्यांना आवाहन ठरतात. जरी धवळ्यांचा अनेकांनी अभ्यास केला असला तरी या गोष्टीनकडे मात्र अभ्यासकांचे लक्ष म्हणावे तितके गेलेले नाही. धवळयाचा अभ्यास करत असताना त्यातून चित्रित झालेला समाज हा प्रामुख्याने संस्कारसंपन्न होता. त्या समाजात विणकाम कला, शिवणकला, रंगकाम, भरतकाम, पाककला, नृत्यकला, गायनकला, वाद्यकला, सुतारकाम, सुवर्णकला आणि वास्तुकला या सर्व कला समृध्द आणि शास्त्रीय दृष्टया संपन्न होत्या. त्यातील कला कौशल्य अतिशय कलात्मक पध्दतीने चित्रित झालेले आहे. धवळ्यातून समाजजीवनातील घटक कारागीर-जमाती व इतर जाती-जमातीचेही चित्र समर्थपणे उमटले आहे. त्यात सुतार, लोहार,

सोनार, विणकर, पट्टेकरी, पटवेकरी, कुंभार, शिंपी, वाणी, रंगारी, आत्तार, रत्नपारखी, तुरेकार, शांखिये, टाळकरी, गवंडी, चित्रकार, गायक, नृत्यांगणा, शृंगारनिपुण, स्त्रिया, भंडारी, मांडलीक, सखी, अंगरक्षक, वाजंत्री इत्यादींचे अत्यंत बोलके चित्र महदंबेच्या धवळयात उमटले आहे.

त्याचबरोबर तत्कालीन विवाहपध्दती रूढी परंपरा यांचे चित्रणही तिच्या साहित्यात अत्यंत वेधकपणे चित्रित झाले आहे. उच्चभ्रू लोकाप्रमाणेच अगदी तळागाळातील लोकातसुध्दा लग्नसंमारंभ हे मंगलकार्य म्हणूनच ओळखले जात होते आणि म्हणूनच ते अत्यंत उत्साहाने साजरे केले जात. महदंबेने याचे रेखाटन आपल्या धवळयात अत्यंत बोलक्या शब्दात केले आहे. लग्नप्रसंगात मांडव घालणे, कुंकवाचे सडे टाकणे, मंगल वाद्ये वाजविणे, रांगोळी काढणे, नवरदेवाला, नवरीला सजवणे, नवरा नवरीला कंकण, बांधणे, हातात लग्नाची सुपारी बांधणे हळद लावणे व काढणे, औक्षण करणे, अंगास तेल चोळुन अंघोळ घालणे, नृत्यारास करणे, अंगास चंदनाची उटी लावणे, कपाळास कस्तुरीचा टिळा, रूकवत देणे, वरास गीत, गाणे, नवरानवरीला मुंडावळया आणि बाशिंग बांधणे, त्यांची घोडयावरून वरात काढणे, नवरानवरीच्या आयानी (वरमायानी) त्यांना ओवाळणे, लिंबलोण अतरून टाकणे, नवरदेवाला वस्त्रालंकारानी सजविणे, करमणुकीसाठी नृत्यांगनांचे नृत्य करणे, मंगलअष्टका म्हणणे, नवरानवरीच्यामध्ये लग्नाचे वेळी मंगलाष्टका म्हणताना अंतरपाट धरणे, भोजनात पंचपक्वाने वाढणे, मेव्हण्याची मेव्हण्यांनी थट्टामस्करी करणे, लग्नामध्ये आहेर करणे, व-हाडी मंडळींचा एकमेकांने मानसन्मान करणे अशा पध्दतीचे रूढीपरंपराचे चित्रही धवळयातून समर्थपणे चित्रित झाले आहे.

याप्रमाणेच यादव काळात सर्वच कला या अगदी संपन्न होत्या. याचेही चित्रण महदंबेच्या साहित्यात उमटलेले आहे. त्यातून पैठणीस तयार होणारे रेशमी वस्त्र किती कौशल्यपूर्णतेने तयार केले जात असे त्याचा थोडक्यात इतिहासच

आपणासमोर उभा ठाकतो. महदंबा ही मूळ मराठवाडयातील आहेत. त्यामुळे तिच्यावरचे संस्कार हे मराठवाडयाच्या परिसरातीलच आहे. तिचा संबंध १३व्या शतकात अनेकवेळा पैठणाशी आला आहे. त्या कालात पैठणाच्या रेशमी वस्त्रांना मोठया प्रमाणावर मागणी होती. याचेही वर्णन तिच्या साहित्यात चित्रित झाले आहे. यादवकाळात पैठणाच्या रेशमी वस्त्रांना मोठया प्रमाणात मानाचे स्थान प्राप्त झाले होते. हे ऐतिहासिक सत्य आहे. या वस्त्रांचे अनेकवेळा धवळयातून वर्णन आले आहे. या पैठणाच्या वस्त्रांना पाठावू वस्त्र असे म्हटले जात होते. या धवळयातील लग्नकार्यातील वर्णनात अनेकवेळा वस्त्रांची आणि अलंकारांची रेलचेल झाली आहे. धवळयातील १३व्या ओवीत त्याचा उल्लेख आढळतो. पाठावू रेशमी महावस्त्र पैठणामध्येच विणले जात असे व ते आजही विणले जाते. त्यालाच पैठणी असे म्हणतात. पाठावूचेच यादवकालानंतर पैठणी असे नांव पडले. पाठावू म्हणजे उंची रेशमी जरतारी महावस्त्र होय. याचा वापर राजघराण्यातील स्त्रिया करीत असत. हे सौभाग्य लेणे म्हणून वापरले जात असत. याचे पुरावे तत्कालीन वाड्.मयात मिळतात. यावरून यादवकाळातील परिस्थिती ही वैभवसंपन्न होती. हे आपल्या प्रत्ययाला येते. महदंबेच्या साहित्यात पाठावू या शब्दाबरोबरच सोनसळा मालगंठी असे वस्त्राचे नांव आलेले आहे. धवळयाच्या पूर्वार्धात एकूण सतराव्या ओवीत मालगंठी नेसला. सोनसळा असे वाक्य आले आहे. हे मालगंठी महावस्त्र म्हणजे श्रीकृष्णाचे पितांबर असावे. कारण यादवकालात मालगंठी पितांबर असे उल्लेख सापडतात. उत्तरार्धातील १९व्या ओवीत पितांबर देवो नेसली सोनसळा या वस्त्राचा उल्लेख या साहित्यात वेळोवेळी येतो. हे वस्त्र कसे तयार केले जात असावे याबद्दलचीही अल्पशी माहिती या साहित्यात मिळते. हे वस्त्र यादवकाळात साळी समाजाचे लोक विणत असत. याचाही पुरावा मिळतो. तसा उल्लेखही केला गेला आहे.

या धवळयातून अनेक अलंकारांचेही वर्णन आले आहे. पुढे पुढे तर

सौंदर्यशाली अलंकार भूषाणे इतकी विविधतेने चित्रित झाली आहेत की, तत्कालीन स्त्री व पुरुष हे हौसेखातर सोने चांदी या मौल्यवान धातुपासून हे अलंकार अतिशय कौशाल्यपणे तयार करून घेत असत. त्याचबरोबर रत्नमाणके, हिरे, मोती, पोवळे, यांचाही वापर केला जात असे. यादवकाळात अलंकारांची संपन्नता आणि विविधता ही मोठया प्रमाणावर भरभराटीला आली होती. हे अलंकार वैभव या साहित्यातून वर्णीत झाले आहे.

श्रीकृष्ण आणि रुक्मिणी विवाहाचा विषय धवळयात गुंफताना महदंबेच्या स्त्रीसुलभ स्वभावाचे वैशिष्टयही जाणवते. महदंबेच्या या धवळ्यातून वस्त्र आणि अलंकार यांचा सुकाळ असलेला प्रत्ययाला येतो. यादवकाळात पैठण देवगिरी या शहरातून हि-यांना व रत्नांना पैलु पाडण्याचे कारखाने होते, असेही इतिहासात चित्रण झाले आहे. अशी अलंकार भूषाणे वस्त्रे यांनी हा काळा संपन्न असलेला महदंबेच्या धवळ्यातून प्रत्ययाला येतो. धवळ्याच्या पूर्वार्धात तेराव्या ओवीत परळे साखळे पूर्वार्धातील २९व्या ओवीत कुडगीया साखळीया ३४व्या ओवीत कंठी कौस्तुभ ३९व्या ओवीत कणकपरियेळ, ५३व्या ओवीत एकावळी रत्नांचे झाळबुके सरी साखळीया तोडरु, ७३ व्या ओवीत अलंकार कांकणे, पदक अशी अलंकाराची नांवे व वर्णने आली आहेत. धवळयांच्या उत्तरार्धात ओवीक्रमांक १८, १९, २०, २३, २५, ३०, ३४, ३७, ४२, ५०, ६१ या ओव्यातून पदके,कुंडले, मुद्रिका, अलकंार, माणिकांचे दांडे मुक्तांचे हार, सुवर्णकळस, मकर कुंडले, झाळबुके, कौस्तुभ कंठी, अशी अलंकारांची नावेही आहेत. १४८ ओव्यातील जवळजवळ २५ ओव्यामधून या अलंकारांची नांवे आलेली आहेत.

महदंबेच्या साहित्यात तत्कालीन समाजजीवनातील विणकर, सोनार यांच्या कलाकौशल्याच्याव वर्णनाबरोबरच तत्कालीन वाद्यंत्री यांचीही माहिती आपणास मिळते. मंगलप्रसंगी विविध वाद्ये वाजविली जात. यात टाळ, संखभेरी, तुरे ही वाद्ये वाजविली जात असत. असा उल्लेख सापडतो. त्याचबरोबर नगारा

निशान हीही वाद्ये वाजविली जात असत. टाळ हे धातूवाद्य आहे. तर तु-या म्हणजे तुतारी, निसान म्हणजे चर्मवाद्य, संक म्हणजे शंख, अशी वाद्ये वाजविणारी लोकही त्यातून चित्रित झाली आहेत. तत्कालात तयार केले जाणारे अन्नपदार्थ हे विविध असल्याचे प्रत्ययाला येते. तांदळाची खीर, दहीवडे, पंचपक्वान्ने चतुरविध अन्ने याचे वर्णन धवळयांच्या उत्तरार्धातील ३८व्या ओवीत आलेले आहे. तत्कालीन समाजात आंबट, तिक्ट, गोड पदार्थ केले जात व त्याचे सेवनही केले जात असे. पणे, कढी, खीर, आमटी पिण्यासाठी सरबत केले जात. त्याचबरोबर टोमॅटो, काकडी, मुळा यांच्या कोशिंबीरीही केल्या जात. याचाही परिचय आपणाला या साहित्यातून होतो.

महदंबेच्या साहित्यातून तत्कालीन समाजातील स्त्रियांचे सौंदर्यही चित्रित झाले आहे. तत्कालीन स्त्रिया शृंगारनिपुन सुंदर लावण्याने बहरलेल्या सौंदर्याने नटलेल्या वेधक आणि मोहक अशा होत्या. यावरूनच तो काळ सुखी व संपन्न होता. हे जाणवते. या धवळ्यातून संपन्न स्त्रीचे दर्शन आपणास घडते. महदंबेने आपल्या साहित्यात या स्त्रीला सुंदरी, सो, लावण्ये, सो चातुर्य, लावण्यराशी सावळीया सुंदरी, त्रैलोक्य मोहिनी, लावण्यवेली अशा विविध उ उपमा तिला दिल्या आहेत. त्याचबरोबर चंद्रवदना, त्रैलोक्य मोहिनी लावण्यवेली, मृगलोचना सकाळ, कला कुशल हसगती अशा शब्दातूनही हे सौंदर्य प्रक्ट केले आहे. त्यातून स्त्री-मनाच्या विविध भावछटाही चित्रीत झाल्या आहेत.

महदंबेच्या साहित्यातून भाषेतील व्याकरण विशेषही आपल्या प्रत्ययाला येतात. धवळयांचा अभ्यास करत असताना धवळ्याची भाषाशैली व तिचा यादवकालीन डौल मनाला मोहून टाकतो. तिच्यात हिंदी, कानडी, गुजराथी, पारशी, शब्द आपणाला भेटतात.

अ) वर्णप्रक्रिया:

महदंबेच्या साहित्यात ब-याच अंशी -हस्व स्वर आढळतात. महदंबेची ही लकब अर्धमागधीतील जाणवते. उदा. कुमारी - कुमरी, रखमीनी - रुक्मिणी, या -हस्व स्वरांच्या बरोबर दिर्घस्वरही प्रत्ययाला येतात. उदा. माहादाया- महादाया, माहादेवी - महादेवी,

१. संयुक्त स्वर - क्षोमा - क्षामा, क्षोत्रीय - क्षत्रिय, क्षेना - क्षण.
२. स्वरभक्ति - सोरीगीरी - श्रीगीरी, आरत - आर्त, भात - भक्त, इत्यादी.
३. स्वरलोप - उदा. ब्रीद - बिरुद, व-हाड - वरहाट,
४. अर्धस्वर - उदा. वोगर - ओगर,
५. महाप्राण - उदा. वहुमाया - वधुमाया, वोहर - वधुवर.
६. वर्णसंयोग - उदा. तुग - तुरग, न्ग्री - नगरी.

ब) विभक्ति प्रत्यय:

१. प्रथमा - रावो, सुदेवो, शिशुपालु, भीमकु.
२. द्वितीया - गोविंदुराणा, कृष्णा, चिंता इ.
३. तृतीया - रुक्मिणी, शिशुपाळ, बाळा, गोपाळे, देवे इ.
४. चतुर्थी - ब्राह्मणा, रणाशी, रुक्मीणी, भाटां,
५. पंचमी - द्वारकेहुनि - "उन", "हून" प्रत्यय.
६. षष्ठी - भिभाका (च्या), योगीया (चा) वल्लभु = (चे) अशी रूपे विपुल प्रमाणात येतात.
७. सप्तमी - माही "माझ".
८. संबोधन - ताता, विप्रा.

क) सामान्य रूपे:

१. विभक्तिप्रत्यय - नामाचे सामान्यरूप न होता विभक्ति प्रत्यय सरळ प्रतिपादकालाच लागतात. वीप्रे, ताते, द्वारीं, सींहासनीं, दीसीं.

२. प्रत्ययात्मक शब्दयोगी साधित विभक्ति : येथे नामाचे सामान्यरुप न दिसते तरी त्याची बीजे प्रत्ययास येतात. ही रुपे संस्कृतातील विभक्तिप्रत्यय लागल्याने सिध्द होत नाहीत तर मुळात शब्दयोगी अव्यये असणाऱ्या स्वतंत्र शब्दापासून झालेली प्रत्ययरुपे लागून सिध्द झाली आहेत.
सर्वभारेसी, भीमकेसी.

३. शब्दयोगी - साधित विभक्ती - नामाचे सामान्यरुप होऊन त्यास विभक्तिदर्शक शब्दयोगी अव्यये लागतात. पंचमी - द्वारकेहुनि, माडावरुनिंया, सप्तमी - त्रिभुवना माझारी, राऊळाभीतरी, लोकामाझारी, खांदावरि, कटकाआंतु.

ड) <u>सर्वनाम प्रत्यय:</u>

प्रथमा - मीं, तूं.
द्वितीया - यातें
तृतीया - तिया
चतुर्थी - इस, तीयां
पंचमी - त्याहुनि
षष्ठी - काह-याचे, मज माझोनि
सप्तमी - तयांतु

इ) <u>क्रियाप्रत्यय:</u>

१. वर्तमानकाळ प्रत्यय: त, ती, ता. ती. सी. य. (ये) ए.
ठाकत, जाणती, निवताती, वरीसी, मीरवताए.
२. भूतकाळ प्रत्यय : ला (लागला), ऐल (हरिखैला)
३. भविष्यकाळ प्रत्यय : ऐल - न, देखिजैल - असैन
४. आज्ञार्थवाचक - आइका, राहे
५. अकरणरुप - नेदी, नेदखोचि

६. कर्मणी : कीजे, दीजे.

७. तुमन्त : पुसो, वैसो.

८. ल्यबन्त : गरुनि, देखोनि, आइकोनिया.

उ. धवळ्यांतील वाक्यप्रचार:

पवाडे करणे, आइकाठी नसणे, पाठवणी देणे, मनीचा कनवाळा न धरणे, चालता मेदिनी ठावो नसणे, उपकारास उतराई होणे, पायी लागणे, प्रेमपिसे लागणे, लोणावण-केळवण करणे, नींबलोण उतरणे, ताटकादा होणे, गाते-वाते येणे.

महदंबेच्या वाङ्‌मयाची भाषा म्हणून ती स्वतंत्र भाषाशैली आहे. ही भाषाशैली स्वतंत्रपणे आपले लक्ष वेधून घेत नाही. अत्यंत साधेपणा, अनलंकृतपणा हे तिचे वेगळेपण आहे आणि त्याचमुळे धवळे व रुक्मिणी स्वयंवर वाचत असताना वाचकाचे लक्षच विचलीत करत नाही. इतकीही भाषाशैली आशयनिष्ठ आहे. तिने आशयासाठी आपले स्वत:चे स्वत्त्व झाकूनटाकले आहे. साधे आणि अनलंकृत वर्णन हाच काव्याचा विशेष होवू शकतो हे धवळ्यांनी दाखवून दिले आहे. धवळ्यातून व रुक्मिणी स्वयंवरातून जे अलंकार येतात ते बोली भाषेच्या अनुषंगानेच येतात ते काव्याला सजवण्यासाठी येत नाहीत.

महदंबेची धवळ्याची व मातृकी रुक्मिणी स्वयंवराची भाषा ही बोली भाषा आहे. तशीच ही बोली भाषा स्वतंत्र महदंबेची भाषा आहे. आणि त्यातून तिच्या मनाचे वेगळेपण स्वतंत्रपणे जाणवतेही. तिच्या व्यक्तिमत्वाच्या ठिकाणी असलेले साधेपणा सरलत्व, सहजत्व, प्रवादित्व, अल्पाक्षरत्व, अनलंकृतता, ही गुणवैशिष्टयेही या साहित्यातून प्रकट झाली आहेत. ही सारीच वैशिष्टये तिच्या व्यक्तिमत्वावर झालेल्या संस्काराचेच प्रतिनिधीत्व करतात. जरी ही

भाषाशैली तेराव्या शतकातील यादवकालीन असली तरीही तिच्यातून महदंबेचे असे वेगळेपण निश्चित जाणवते. तिच्या शैलीला क्लेविषायीची आवड, स्त्रीसुलभता, पंतनिष्ठा, सूक्ष्म अवलोकन, जिज्ञासू वृत्ती, आणि तिचे स्वत:चे असे बौध्दिक सामर्थ्य या तिच्या वृत्ती वैशिष्टयांचा या लेखनाला सुगंध आहे आणि म्हणूनच आजही तिचे पांडित्यातील हे लेखन तिच्या आद्य कवयित्री वृत्तीला आणि वाङ्.मयाला शोभणारेच आहे.

महदंबेची ही दोन कथाकाव्ये आरती, ओव्या ही साहित्यनिर्मिती आजही साहित्यसोनियाच्या खाणी प्रमाणेच श्रेष्ठत्वाला पोहचले आहे. यातून महदंबेच्या वाङ्.मयीन आविष्काराचा वेगळा प्रत्यय येतच रहातो. तिच्या साहित्यातून व्यक्तिदर्शनापेक्षाही प्रसंग दर्शनावर अधिक भर दिला गेला आहे. त्या प्रसंगातील नाटयात्मकता तिने समर्थपणे टिपलेली आहे. तिच्या साहित्यातील कथा निवेदन कथा दर्शनाच्या पातळीवर एकसारखे अविरत प्रवाही राहू पहाते. आशय आणि अभिव्यक्ती यातील अद्वैत्य महदंबेने सदैव जागते ठेवले आहे. आणि हे कौशल्या तिला सहज साध्य झाले आहे. कारण ही साहित्यनिर्मिती तिच्या दृष्टीने स्वतंत्र क्लानुभव झालेली आहे. इतर उप-या कल्पना तिच्या वृत्तीच्या बाह्यांगावरून झाडांच्या पानांसारख्या गळून पडताना दिसून येतात. हा क्लानुभव तिच्या व्यापक मनाला अंतर्बाह्य व्यापून राहिला आहे. महानुभावीयांचे अभ्यासक तिच्या प्रतिभेला मर्यादा घालत असले तरीही तिची प्रतिभा खळाळणा-या झ-याप्रमाणे सदैव प्रवाही आणि विशाल आहे. तिच्या वाङ्.मयातून आलेली कथा ही तिच्या अनुभवाच्या चैतन्याने रसरसलेली आहे. तिची भाषाशैली अनलंकृत आणि साधी असली तरीही उत्स्फुर्तता साधेपणा हाच तिचा श्रेष्ठ अलंकार झाला आहे. तिच्या शैलीतून तिच्या वृत्तीच्या ठिकाणची असणारी निरागस वृत्ती मनाचा निष्पाप आणि भावडेपणा यातून चित्रित झाला आहे. एखाद्या दर्पणाप्रमाणे या साहित्यातून तिचे स्वतंत्र असे व्यक्तिमत्वाचे प्रतिबिंब प्रत्ययाला येते. तिचे आद्यत्व तरी सद्य:स्थितीत निसंशय आहेच. कारण तिच्या आद्यत्वाचे सारेच अविष्कार तिच्या साहित्यातून साकार होतात. तिच्या प्रतिभेला आणि मर्यादित साहित्याला कांही मर्यादा असल्या तरीही तिचे हे आद्यत्वाचे यश अमर्याद आहे, हे आपणाला नाकारता

## प्रकरण सहावे

## संदर्भ साहित्य

१. मराठी वाङ्मयाचा इतिहास, (संपा). शं.गो. तुळपुळे, खंड पहिला, मराठी साहित्य परिषद, पुणे, प्रथमावृत्ती, १९८४.

२. आद्य मराठी कवयित्री, वा.ना. देशपांडे, कॉण्टिनेंटल प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, १९५६, पृष्ठ क्रमांक १५.

३. एकनाथ वाङ्मय आणि कार्य, न.र. फाटक.

४. गोविंदप्रभूचरित्र, वि.भि. कोलते, लीळा क्र. २२४.

५. आद्य मराठी कवयित्री, वा.ना. देशपांडे, कॉण्टिनेंटल प्रकाशन, पुणे, द्वितियावृत्ती, १९५६, पृष्ठ क्रमांक १७.

६. मराठी साहित्याचे आदिबंध, डॉ. उषा महादेव देशमुख, लोकवाङ्मयगृह, गिरगांव मुंबई, प्रथमावृत्ती, १९९२, पृ.क्र. ११५.

.....

## समारोप व उपसंहार:

मराठीतील "आद्य कवयित्री महदंबा : चरित्र आणि वाङ्.मय" याचा चिकित्सक अभ्यास करत असताना "महदंबा" ही मराठीतील आद्य कवयित्री आहे आणि "धवळे" हे मराठीतील पहिले कथाकाव्य आहे हे आता निर्विवाद मान्य झाले आहे. तिचे काव्य आणि व्यक्तिमत्व हरहुन्नरी आहे. तिच्या व्यक्तिमत्वाच्या ठिकाणी तिची चर्चक आणि जिज्ञासक वृत्ती हीच या साहित्य निर्मितीला कारणीभूत आहे तिच्या या वृत्तीमुळेच तिचे साहित्य आकाराला आले आहे. तिच्या साहित्यात तेराव्या शतकातील ब-याच गोष्टींचा सहज उलगडा होत जातो. तिचे आशय आणि निवेदन हे सर्वाहून वेगळे आहे. तिची भाषाशैली ही व्यक्तिमत्वाला जिवंत उभी करते आणि त्यामुळे तिला नाटयात्मकता साध्य झाली आहे. पुढच्या अनेक पंडित कवींनी जी रुक्मिणी स्वयंवर लिहिली किंवा कथाकाव्ये लिहिली त्या कथाकाव्यांची सर्व बीजे ही महदंबेच्या साहित्यात सापडतात. तिच्या काव्यातून तिचे स्वत:चे असे पांडित्य शब्दाशब्दांतून वाचकाच्या प्रत्ययाला येते. काव्याची बांधणी करत असताना तिने जे वृत्त निवडले आहे, ते तिने अखरेपर्यंत काटेकोरपणाने पाळले आहे. या सर्वांचा सार्थ अभ्यास या लघुप्रबंधात मांडला आहे.

पहिल्या प्रकरणात प्रबंधापाठीमागची भूमिका विषयाचे महत्व, पूर्वाभ्यासाचे स्वरुप विषय अभ्यासाची निवड आणि प्रस्तुत अभ्यासाची दिशा या सर्वांची यथासांग चर्चा केली आहे.

दुस-या प्रकरणात महानुभावपंथाची पूर्वपिठीका मांडत असताना महानुभाव पूर्वकाळातील वैदिक संप्रदाय त्यातून आलेले कर्मकांडाचे स्तोम आणि त्यामुळे उदात्त आणि उदार तत्वज्ञान सांगणारे बौध्द, जैन, लिंगायत, नाथ, पंथ कसे उदयाला आले त्याची चर्चा, केली. महानुभावपंथाचा उदय त्यातील पंचकृष्ण पंथाचे नामकरण, चर्चा, महानुभावपंथाची बैठक महानुभावपंथाचे प्रवर्तक त्यातील आम्नाय

महानुभावीय शिष्यपरंपरा चक्रधरांचा शिष्यसमुदाय महानुभावीय वाङ्.मय यात गद्य-पद्य वाङ्.मयाचा विस्तर अभ्यास मांडला आहे.

तिस-या प्रकरणात महदंबेचा कुलवृत्तांत, पूर्वचरित्रा, तिचे नामकरण, महदाइसेचे उत्तरआयुष्य, महदंबेचे स्वभावधर्म, महदंबेची गुरुभक्ति, महदंबेची प्रतिभा, जबाबदार अशी महदंबा, महदंबेची काव्यस्फूर्ती, महदंबेचे निधन याविषयीची यथासांग चर्चा या प्रकरणात केली आहे.

चवथ्या प्रकरणात आद्य मराठी ग्रंथकार कोण ? याचा विचार मांडला असून मराठीतील आद्य ग्रंथकार आणि चरित्राकार म्हणून म्हाइंभट्ट याविषयी केलेली चर्चा त्याचबरोबर आख्यान काव्य म्हणजे काय ? आख्यान काव्याचे स्वरूप आणि आद्य मराठी आख्यान काव्य म्हणजे धवळे याची चर्चा केली आहे.

पाचव्या प्रकरणात महदंबेच्या साहित्याच्या प्रेरणा व स्वरूप यांची चर्चा केली आहे त्यात महदंबेचे धवळे प्रेरणा, स्वरूप, ह्यावर चर्चा करत असताना धवळ्याची निर्मिती कशी झाली. धवळ्यातील काव्यसौंदर्य, धवळ्याचा रचनाकाल, धवळ्याचा छंद, धवळ्याची भाषा आणि व्याकरण, तत्कालिन सामाजिक स्थिती याची चर्चा केली आहे व महदंबेचे मातृकी रुक्मिणी स्वयंवर प्रेरणा व स्वरूप, त्याचा रचनाकाल रुक्मिणी स्वयंवराचा विषय. रुक्मिणी स्वयंवराची रचना या काव्याचा प्रारंभ काव्याची वृत्तबध्दता मातृकी रुक्मिणी स्वयंवरातील नाटय याची चर्चा केली असून पुढेमहदंबेच्या गर्भकांडाच्या ओव्या त्याचे प्रेरणा आणि स्वरूप याविषयी चर्चा केली आहे.

सहाव्या प्रकरणात महदंबेच्या वाङ्.मयाचे मूल्यमापन केले आहे. यात महदंबेच्या काव्याचे आद्यत्व धवळे ही स्वतंत्र निर्मिती, धवळ्याचा पूर्वार्ध आणि उत्तरार्ध, धवळे व रुक्मिणी स्वयंवर यातील वेगळेपण धवळ्यातील तत्कालीन चालीरिती, रूढी परंपरा याचे आलेले चित्रण यातील वर्णप्रक्रिया, विभक्ती याविषयी चर्चा केली आहे. त्याचबरोबर महदंबेच्या अप्रकाशित साहित्याची चर्चा केली आहे. अशा प्रकारे महदंबेच्या वाङ्.मयाचे मूल्यमापन केलेले आहे.